हॅलो प्रभात दि. 26/9/2024

# विवेकानंदच्या छात्रांची दिल्ली कॅम्पमध्ये निवड



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील खालील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली होती. यामध्ये ज्युनिअर अंडर ऑफिसर सेला रेंगे, बी.एस्सी.बायोटेक भाग ३ हिने हेल्थ-हायजिन व टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. सेला रेंगे हिला टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सुवर्णपदक मिळाले. तसेच सिनिअर अंडर ऑफिसर चेतन पवार , बी.कॉम.भाग ३ व सार्जण्ट सार्थक कुलकर्णी १२ वी आर्टस याची फायरींग इव्हेंट साठी निवड झाली होती. वरील तीनही छात्र थल सैनिक कॅम्प दिल्ली यशस्वीरित्या पूर्ण करुन परत आले. याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य मा. अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी मा.प्राचार्या सौ शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. वरील छात्रांना ५ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. यावेळी प्रबंधक श्री. रघुनाथ जोग उपस्थित होते.

26/09/24

26-9-2024

लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४

५

# 'विवेकानंद'मध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील सेला रेगे, चेतन पवार व सार्थक कुलकर्णी यांनी दिल्लीतील थल सैनिक शिबिर यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत
epaper.lokmat.com २
कोल्हापूर, मंगळवार, दि. १७ सप्टेंबर २०२४

# बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश, प्रणालीला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महापालिकास्तरीय शासकीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १९ वर्षे मुलांच्या गटात विवेकानंद कॉलेजचा ऋषिकेश कबनूरकर आणि मुलींच्या गटात प्रणाली गोरे विजेती ठरली.

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे सेंट झेवियर्स हायस्कूल येथे स्पर्धा झाल्या.

## स्पर्धेचा अनुक्रमे निकाल असा

■ **१४ वर्षे मुले :** राजदीप पाटील, कोल्हापूर पब्लिक स्कूल, आरव पाटील, शांतिनिकेतन स्कूल, संस्कार काटकर, न्यू हायस्कूल, अर्णव पोर्लेकर, न्यू हायस्कूल, सर्वेश पोतदार, प्रायव्हेट हायस्कूल.

■ **१४ वर्षे मुली :** अरिना मोदी, पोद्दार स्कूल, वेदिका मदने, प्रायव्हेट हायस्कूल, स्नेहल गावडे, प्रायव्हेट इंग्लिश स्कूल, प्रांजल चव्हाण, वसंतराव देशमुख हायस्कूल, सृष्टी जोशीराव, प्रायव्हेट हायस्कूल.

■ **१७ वर्षे मुले :** अरीन कुलकर्णी, वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूल, व्यंकटेश खाडे पाटील, सेवेन्थ डे हायस्कूल, अनय दोशी, वि. स. खांडेकर प्रशाला, शंतनू पाटील, विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूल, प्रणव मोरे, स. म. लोहिया हायस्कूल ज्युनिअर कॉलेज.

■ **१७ वर्षे मुली :** महिमा शिर्के, सेवेन्थ डे हायस्कूल, वृद्धी गायकवाड, डी. वाय. पाटील विद्यानिकेतन साळोखेनगर, अवनी कुलकर्णी, श्रीमंत माईसाहेब बावडेकर माध्यमिक विद्यालय, सिद्धी वरपे, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, अवनी पाटील, वसंतराव देशमुख हायस्कूल.

■ **१९ वर्षे मुले :** ऋषिकेश कबनूरकर, विवेकानंद कॉलेज, यश भागवत, न्यू मॉडेल इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, तेजस कुंदग्री, डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेज, साक्षद खांडेकर, न्यू मॉडेल इंग्लिश मीडियम स्कूल, सिद्धू कंकणवाडी, विवेकानंद कॉलेज.

■ **१९ वर्षे मुली :** प्रणाली गोरे, विवेकानंद कॉलेज, पूर्वी गावडे, विवेकानंद कॉलेज, जुई चोरगे, छत्रपती शाहू विद्यालय, भवानी जोशी, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल, मधुरा देसाई, कमला कॉलेज.

०१/१०/२०२४

पुण्य नगरी

मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# 'विवेकानंद'मध्ये रांगोळी स्पर्धेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'व्हेक्टर बॉर्न डिसिजेस' या विषयावर रांगोळी स्पर्धेस प्रतिसाद लाभला. गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रा.डॉ.उर्मिला खोत यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यातील विजेते अनुक्रमे, सनोवर मुल्ला आणि रुशिता पोवार, वैष्णवी चव्हाण आणि कल्याणी यादव, मानसी गुरव आणि दिव्या गायकवाड. विजेत्यांचा विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. व्ही. व्ही. मिसाळ यांनी प्रास्ताविक केले.

25/09/2024
PR 25/9/24

पुण्य नगरी ३
बुधवार, २५ सप्टेंबर २०२४

# विद्यार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा : दिवाण

## विवेकानंदमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत



कोल्हापूर : स्वागत कार्यक्रमात विद्यार्थ्यांना रोप भेट देताना मान्यवर.

कोल्हापूर : प्रतिनिधी

नावीन्याची क्षमता अभियंत्यांनी समजून घेतली पाहिजे. नावीन्यपूर्ण उत्पादनांचा विकास करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे प्रतिपादन इंद्रदीप ऑटोचे मॅनेजिंग पार्टनर देवेंद्र दिवाण यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या 'स्वागत समारंभ'प्रसंगी ते बोलत होते.

सामाजिक बांधिलकी जपताना इन्स्टिट्यूटतर्फे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना रोप भेट देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती, परीक्षा योजना, विविध अधिविभाग, इन्स्टिट्यूटद्वारे राबवले जाणारे उपक्रम, संस्थास्तरीय शिष्यवृत्तीची माहिती दिली.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य डॉ. विशाल पोवार, रजिस्ट्रार अमित आव्हाड, समन्वयक प्रा. रोहन पाटील, प्रा. हेमंत शिंदे आदी उपस्थित होते. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. अशोक कोळेकर, प्रा. आरती चव्हाण यांनी केले. प्रा. सुदर्शन महाडिक यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

सोमवार, १६ सप्टेंबर २०२४

# विवेकानद कॉलेजचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनएसएस विभागामार्फत कसबा बावडा येथील पंचगंगा नदीघाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करण्यात आले. घरगुती गणपती विसर्जनप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला. या उपक्रमास कसबा बावड्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संकलित मूर्ती महानगरपालिका प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या. याचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएसचे अधिकारी प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे यांनी केले. यावेळी डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. विठ्ठल पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, डॉ. कैलास पाटील व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कॉलेजचे रजिस्ट्रार आर. बी. जोग आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

कोल्हापूर, सोमवार, २ सप्टेंबर २०२४ पुढारी ७

# विवेकानंद कॉलेजचा साहिल तुरटे मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम

**कोल्हापूर :** राष्ट्रीय खेळ दिनानिमित्त कोल्हापूर एनसीसी ग्रुपमार्फत पाच किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेत साहिल तुरटे याने प्रथम क्रमांक पटकाविला. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय खेळ दिनाच्या औचित्याने सर्व समावेशक व शांतीपूर्ण समाज निर्मितीसाठी राष्ट्रीय खेळ दिनानिमित्त एनसीसी ग्रुपमार्फत स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत शहरातील ४०० एनसीसी छात्रांनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, रजिस्टार आर. बी. जोग, कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ३ सप्टेंबर २०२४

# 'विवेकानंद'मध्ये जागतिक नारळ दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक नारळ दिन साजरा करण्यात आला.

नारळाच्या विविध पाककृती, कलाकृती व नारळाची उपयुक्तता दाखवणाऱ्या भित्तीपत्रकांचे प्रदर्शन आयोजित केले होते. देशात नारळाचे आध्यात्मिक व औषधी मूल्य आहे. नारळाची सार्वत्रिक उपयुक्त पाहता नारळ लागवड आणि उद्योगातून चांगला रोजगार मिळू शकतो, असे मत कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. नारळ पाककृतीचे परीक्षण डॉ. यू. एस. खोत व डॉ. एस. आय. इनामदार यांनी केले. नारळाच्या विविध कलाकृतींचे परीक्षण डॉ. व्ही. बी. वाघमारे यांनी केले. नारळाच्या भित्तीपत्रिकांचे परीक्षण डॉ. एस. एस. लट्ठे व डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी केले.

03/09/24

3/9/24

पुढारी
मंगळवार, १० सप्टेंबर २०२४



डॉ. अजिंक्य पत्रावळे प्रा. डॉ. प्रशांत अनभुले डॉ. दत्तात्रय चांदम डॉ. अनिल गोरे प्रा.डॉ. गोविंद कोळेकर प्रा.डॉ. मधुकर देशमुख

# शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापकांच्या संशोधनास 'यूके'चे पेटंट

## कर्करोगावरील निदानासाठीची यंत्रणा विकसित करण्याचे ध्येय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि विवेकानंद महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या संशोधनास 'यूके'चे पेटंट मिळाले. भविष्यात सोप्या पद्धतीने प्राथमिक टप्प्यात कर्करोगाच्या निदानासाठीची यंत्रणा विकसित करता आल्यास उपलब्ध असणाऱ्या औषधाचा वापर करून कर्करोगावर नियंत्रण मिळवता येईल, असे संशोधकांना वाटते.

विवेकानंद कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागातील डॉ. अजिंक्य पत्रावळे व शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. गोविंद कोळेकर, वरिष्ठ प्रा. डॉ. मधुकर देशमुख, भोगावती महाविद्यालय येथील डॉ. दत्तात्रय चांदम, ऊका तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकॅल सायन्स-सुरत येथील डॉ. अनिल गोरे यांनी संयुक्त प्रयत्नातून ड्रग लाईक मॉलिक्युल्स याची निर्मिती केली.

किमो उपचारादरम्यान रुग्णांना असह्य वेदना, त्रास होतो. त्यांचे मूळ कारण म्हणजे कर्करोगामुळे प्रभावित पेशी व अप्रभावित पेशीत फरक करता न येणे. याचा विचार करून निवडक प्रकारचे कंपाऊंड बनवणे व फक्त निवडक पेशीवर प्रभावी कार्य करण्याची योजना संशोधकांनी बनवली. त्याचा एक भाग म्हणून हरित पद्धतीचा वापर करत इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड बनवून त्यांचे स्तनाच्या कर्करोगावर इन विट्रो पद्धतींनी तपासणी करण्यात आली. प्राथमिक चाचणीत इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड स्तनाच्या कर्करोगावरील निवडक पेशीवर अत्यंत प्रभावी पद्धतीने परिणाम करताना दिसून आले. परंतु, नॉर्मल पेशीवर त्यांचा प्रभाव पडताना दिसला नाही. इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड हे फक्त स्तनाच्या कर्करोगावरील पेशीवरच प्रभाव करतात का, हे पाहण्यासाठी इतर कॅन्सरवर देखील चाचणी घेण्यात आली. परंतु, अन्य कॅन्सरवर त्यांचा प्रभाव दिसून आला नाही.

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# महाराष्ट्र हायस्कूल, गुरुदेव, विवेकानंद कॉलेज विजयी

## महापालिकास्तर व्हॉलीबॉल स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : महापालिका प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ आणि १७ वर्षांखालील मुला-मुलींमध्ये अनुक्रमे महाराष्ट्र हायस्कूल व गुरुदेव विद्यानिकेतनने, तर १९ वर्षांखालील मुला-मुलींमध्ये विवेकानंद कॉलेजने विजेतेपद पटकाविले.

महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांमध्ये श्री गुरुदेव विद्यानिकेतनने जीवन कल्याण माध्यमिक विद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपद मिळवले, तर मुलींमध्ये महाराष्ट्र हायस्कूलने गुरुदेव विद्यानिकेतनचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घातली.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये श्री गुरुदेव विद्यानिकेतनने जीवन कल्याण माध्यमिक विद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव केला, तर मुलींमध्ये महाराष्ट्र हायस्कूलने न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलचा तीन विरुद्ध शून्य गुणांनी मात करीत विजेतेपद मिळवले.

१९ वर्षांखालील मुलांमध्ये विवेकानंद कॉलेजने महावीर कॉलेजचा दोन विरुद्ध एक गुणांनी मात करीत, तर मुलींमध्ये विवेकानंदच्याच संघाने महाराष्ट्र हायस्कूलवर दोन विरुद्ध शून्य गुणांनी मात करीत विजेतेपद मिळवले.

24/09/24

24.09.24

कोल्हापूर, मंगळवार, १० सप्टेंबर २०२४ सकाळ

# ‘विद्यापीठ-विवेकानंद’च्या कर्करोगावरील संशोधनाला पेटंट

## सहा संशोधक प्राध्यापकांची यशस्वी कामगिरी

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठ आणि विवेकानंद कॉलेजच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापकांनी कॅन्सर (कर्करोग) बाबतच्या ड्रग लाईक मॉलिक्युल्सची निर्मिती केली आहे. त्यांच्या या संयुक्त संशोधनाला युके सरकारचे पेटंट मिळाले.

सहा संशोधकांनी पेटंट मिळविण्याची यशस्वी कामगिरी केली. त्यात विद्यापीठातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, गोविंद कोळेकर, मधुकर देशमुख, विवेकानंद कॉलेजमधील डॉ. अजिंक्य पत्रावळे, भोगावती महाविद्यालयातील डॉ. दत्तात्रय चांदम, सूरत (गुजरात) मधील ऊका तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल सायन्सचे डॉ. अनिल गोरे यांचा समावेश आहे. सध्या किमोथेरेपीचा वापर करून कर्करोगावर उपचार केले जातात; पण उपचारादरम्यान रुग्णांना असह्य वेदनेचा त्रास सहन करावा लागतो. त्यांचे मूळ कारण म्हणजे कर्करोगामुळे प्रभावित पेशी आणि अप्रभावित पेशीमध्ये फरक करता येत नाही. त्याचा विचार करत अतिशय निवडक प्रकारचे कंपाउंड बनवणे. फक्त कर्करोगावरील निवडक पेशीवर प्रभावी पद्धतीने कार्य करावेत, अशी योजना संशोधकांनी बनवली आहे. संशोधनासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य आर. आर. कुंभार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांचे सहकार्य लाभले.

### सर्वसाधारण पेशींवर परिणाम

प्राथमिक चाचणीत इंडिनो पिरीमिडीन कंपाउंड हे ब्रेस्ट कर्करोगावरील निवडक पेशींवर अत्यंत प्रभावी पद्धतीने परिणाम करताना दिसले; परंतु नॉर्मल पेशींवर प्रभाव पडताना दिसत नाही. हे कंपाउंड फक्त ब्रेस्ट कॅन्सरवरील पेशींवरच प्रभाव करतात का? हे पाहण्यासाठी इतर कॅन्सरवरही चाचणी घेतली. मात्र, कोलन कॅन्सर किंवा अन्य कॅन्सरवर त्यांचा प्रभाव दिसला नसल्याची माहिती डॉ. अनभुले यांनी दिली.


डॉ. अजिंक्य पत्रावळे


प्रा. डॉ. प्रशांत अनभुले


डॉ. दत्तात्रय चांदम


डॉ. अनिल गोरे


प्रा. डॉ. गोविंद कोळेकर


प्रा. डॉ. मधुकर देशमुख

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४

# इंधनविरहित सौरऊर्जा संवर्धनाच्या संशोधनास पेटंट


**प्रा. डॉ. चैताली बगाडे**


**किरण बगाडे**


**डॉ. संतोष कांबळे**

कोल्हापूर, ता. ११ : केमिकल डिपॉझिशनच्या साहाय्याने सोलर सेल थीन फिल्म तयार करण्याच्या उपकरणाचे संशोधन शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. चैताली बगाडे, विवेकानंद महाविद्यालयातील किरण बगाडे, सातारा येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सचे डॉ. संतोष कांबळे यांनी केले. इंधनविरहित, पर्यावरणावर कमी प्रभाव करणाऱ्या या उपक्रमाद्वारे ऊर्जा संवर्धनास मदत मिळणार आहे. त्याबाबतच्या संशोधनाला यु. के. (इंग्लंड) चे पेटंट मिळाले आहे.

सहजरीत्या सौरऊर्जेची निर्मितीसाठी केमिकल डेपोसिएशनच्या साहाय्याने थीन फिल्म तयार केले आहे. हे उपकरण नॅनोमिश्रित मटेरियलपासून अत्यल्प किमतीमध्ये सौरऊर्जा तयार करण्याच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्याबाबतच्या संशोधनातील अपेरेटस फॉर केमिकल डिपॉझिशन ऑन नॅनो स्ट्रक्चर थीन फिल्म सोलर सेल या संशोधनाला पेटंट मिळाले आहे.

या संशोधन कार्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनावणे, अप्लाईड केमिस्ट्री विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. व्ही. अनुभुले, प्रा. डॉ. पी. एन. भोसले, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत
मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४



जयसिंगपूर : जिल्हास्तरीय युवा महोत्सवात दीपनृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात १५ कलाप्रकारांचे सादरीकरण

## ■ शिवाजी विद्यापीठातर्फे जयसिंगपूर कॉलेज येथे आयोजन

प्रतिनिधी
जयसिंगपूर

येथील जयसिंगपूर कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाचा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून झाला. यामध्ये १५ कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.

युवा महोत्सवात विविध कला प्रकारांचा निकाल रात्री उशिरा जाहीर झाला. सुगम गायन : प्रथम– सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, द्वितीय– न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, उत्तेजनार्थ– चंद्राबाई शांतापा शेंडूरे कॉलेज, हुपरी, भोगावती महाविद्यालय कुरुकली, एकल लोकवाद्य वादन – प्रथम– दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी, द्वितीय– न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ– सर्व अधिविभाग कोल्हापूर, के. आय.टी चे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर.

मराठी वक्तृत्व : प्रथम – यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, द्वितीय– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, तृतीय– शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ– राजाराम महाविद्यालय कोल्हापूर व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व– प्रथम– न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– दूधसागर महाविद्यालय बिद्री, तृतीय– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, उत्तेजनार्थ डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर व श्री विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगाव. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा : प्रथम– शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय–न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, उत्तेजनार्थ दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर. लोकनृत्य : प्रथम– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, द्वितीय– आजरा महाविद्यालय आजरा, तृतीय– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, लोककला– प्रथम– न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, तृतीय– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तेजनार्थ– डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर व भोगावती महाविद्यालय कुरुकली,

एकांकिका : प्रथम– देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, द्वितीय–न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– दत्ताजीराव कदम कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, उत्तेजनार्थ– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व आजरा महाविद्यालय आजरा.

लघु नाटिका : प्रथम– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, द्वितीय– न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रूकडी, उत्तेजनार्थ –भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर व सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मूकनाट्य : प्रथम– दूधसागर महाविद्यालय बिद्री, द्वितीय– दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय– भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर, उत्तेजनार्थ –विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर. पथनाट्य : प्रथम– शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– राजाराम महाविद्यालय कोल्हापूर, तृतीय– दूधसागर महाविद्यालय बिद्री, उत्तेजनार्थ– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर. भारतीय समूहगीत : प्रथम– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तेजनार्थ– न्यू कॉलेज व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर. वादविवाद : प्रथम– डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, कोल्हापूर, द्वितीय– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, तृतीय– दूधसागर महाविद्यालय बिद्री, उत्तेजनार्थ–न्यू कॉलेज कोल्हापूर व श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी. प्रश्नमंजुषा : प्रथम– के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर, द्वितीय– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय– डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ– न्यू कॉलेज कोल्हापूर व डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर.

तरुण भारत
बुधवार २५ सप्टेंबर २०२४

# विवेकानंद सेवक पतसंस्थेला २ कोटी ६५ लाखांचा नफा



कोल्हापूर : वार्षिक सभेत मार्गदर्शन करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, व्हाईस चेअरमन दिपक जाधव.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्थेची सन २०२३-२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये खेळीमेळीत पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे यांनी अहवाल वाचन केले. त्यांनी सन २०२३-२४ मध्ये पतसंस्थेला एकूण निव्वळ नफा २ कोटी ६५ लाख रूपये झाला असल्याची माहिती दिली. पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे व व्हा. चेअरमन दिपक जाधव यांनी केले. दिवंगत नेते, शास्त्रज्ञ, संशोधक, संस्थेचे सभासदांना श्रध्दांजली वाहण्यात आली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते संस्थेतील गुणवता प्राप्त सभासद पाल्यांचा तसेच सन २०२३-२४ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या पतसंस्था सभासदांचा सत्कार करणेत आला. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी मार्गदर्शन केले. सभेच्या सुरवातीला म अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रके वाचून कायम करण्यात आली. या सभेमध्ये सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. तसेच सभासदांना १०.२५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. सभेचे नोटीस वाचन पतसंस्थेचे सेक्रेटरी संपत वेटाळे यांनी केले. आभार पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन दिपक जाधव यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. प्रदीप पाटील यांनी केले.

तरुण भारत
बुधवार, २५ सप्टेंबर २०२४



कोल्हापूर : दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांबरोबर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक रघुनाथ जोग आदी.

# विवेकानंदच्या छात्रांचा दिल्ली कॅम्पमध्ये सहभाग

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील खालील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली होती. ज्युनिअर अंडर ऑफिसर सेला रेगे, बी.एस्सी. बायोटेक भाग ३ हिने हेल्थ ॲण्ड हायजिन व टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. सेला रेगे हिला टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सुवर्णपदक मिळाले. थल सैनिक कॅम्पसाठी निवड झालेल्यांमध्ये सिनिअर अंडर ऑफिसर चेतन पवार, बी.कॉम.भाग ३ व सार्जण्ट सार्थक कुलकर्णी १२ वी आर्टस याची फायरींग इव्हेंटसाठी निवड झाली होती. वरील तीनही छात्र थल सैनिक कॅम्प् दिल्ली यशस्वीरित्या पूर्ण करुन परत आले. याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गांवडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. या छात्रांना ५ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. यावेळी प्रबंधक रघुनाथ जोग उपस्थित होते.

25/09/2024

25/9/2024

तरुण भारत संवाद
बुधवार, ४ सप्टेंबर २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये क्रीडा दिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्रीडा संस्कृती शासनासह पालकांमध्ये रुजली पाहिजे. ऑलिम्पिक स्पर्धा ही सर्व देश एकत्रित येऊन बंधूत्व् व सहचार्याने राहण्यासाठी आयोजित केली जाते. त्यामुळे सर्व खेळाडूंच्या मध्ये समता, बंधूत्व् , एकता व सहकार्याची भावना रुजली जाते, असे मत भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक अजित पाटील व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते. मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त् राष्ट्रीय क्रीडा दिन समारंभाचे आयोजन महाविद्यालयाच्या आय.क्यु.ए.सी. विभाग व क्रीडा व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमा पूजन केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले, खेळाडूंनी क्रीडा व शिक्षण या दोन्हींची योग्य् सांगड घातली तर चांगले करिअर होऊ शकते. प्रा. मेजर एम. जी. गायकवाड म्हणाले, विद्यार्थ्यांनी जास्तीत खेळात भाग घेऊन खेळांचा प्रचार व प्रसार अधिक केला पाहिजे. त्यामुळे दैनंदिन जीवनात क्रीडा संस्कृती रुजण्यास खूप मदत होईल. प्रा. स्नेहल वरेकर यांनी खेळाडू कसे घडतात याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक व स्वागत जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्रा. समीर पठाण यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी. केले. यावेळी रजिस्ट्रार आर. बी. जोग, डॉ. महेश कदम, एस. व्ही. चरापले, प्रा. किरण पाटील, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

2024

.9.24